File No: 23-814/09 (WRO)
A Cultural Study of Bhedik Literature in Marathi

# मराठी भेदिक वाङ मयाचा सांस्कृतिक अभ्यास

## लघुशोध प्रकल्पाचा सारांश

**मराठी भेदिक वाङ मयाचा सांस्कृतिक अभ्यास** या विषयावर अभ्यास करताना मी सोलापूर जिल्ह्यातील शाहीरांच्या गाठभेटी घेऊन त्यांच्याकडील उपलब्ध हस्तलिखितांच्या आधारेच या लधुशोध प्रकल्पाची संशोकधीय पध्दतीने मांडणी केली आहे. प्रत्यक्ष जिल्ह्यातील विविध गावांच्या जत्रा-यात्रा, ऊरुस यांची माहिती आकाशवाणी सोलापूर यांचेकडे भेट देऊन संकलीत केली. त्याप्रमाणे गावोगावाच्या ग्रामदैवताच्या निमित्ताने यात्रेचे आयोजन केले जाते. त्या प्रसंगी करमणुकीचे कार्यक्रमाचे हमखास नियोजन किलेले असते. गावपंचानी सांगितले निरीक्षणे, भेटी देऊन साधनसामग्री संकलीत केली त्याचे विश्लेषण पध्दतीने स्वरुप व पध्दतींचा (शैली) अभ्यास केला. सोलापूर हे बहुभाषिक शहर येथे कन्नड, तेलुगू, तमिळ, सिंधी, ऊई भाषकांची रजेकसंख्या पुष्कळ प्रमाणात आहे. तसा सीमापर्यंत पोहचला आहे. त्यामुळे विविध गोष्टींची देवाण - घेवाण होण्यास मदत झालेली आहे. तसे पाहिले तर संस्कृती, आचार-विचार यांची आदान-प्रदानता झालेली आहे. त्यावेळी एकमेकांचे रुण, उत्सव, यात्रा वेगवेगळे विधी आनंदात उत्साहपूर्वकरितीने केले जाते. याचप्रसंगी संस्कृतीची, कला व साधनांची देवाण-घेवाण झालेली आहे हे प्रथमत: दिसून आले.

लोकसाहित्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि प्राचीन काळातील प्रयोगरुप कलाप्रकार भेदिक कवितेचे संकलन केले यासाठी बार्शी तालुक्यातील मालवंडी, वैराग, राळेरास, माढा तालुक्यातील मानेगाव, धानोरे, कुर्डुवाडी, मोहोळ तालुक्यातील भांबेवाडी आणि बेगमपूर जवळील भीमानदिच्या काठावरील 'माचणूर' या गावचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराज यांची यात्रा भरते. याला ही महाशिवरात्रीपासून सुरु होऊन ती 'पारणा' या दुसऱ्यादिवशी भेदिक फडाचे भव्य स्वरुपात आयोजन केले जाते. या फडात कमीतकमी दीडशे ते दोनशे शाहीर

आपली कविता सादर करण्यासाठी अत्यंत भक्तीभावाने जमा होतात. दरवर्षी भरणाऱ्या यात्रेत वरीलप्रमाणे शाहीर एकत्र जमतात आणि कवितेचे विविध घटक सुत्ररुपाने गाऊन सादर करतात. यांच्या फडाचे मी व्हिडीओ सूटिंग करुन त्यातील सादरीकरणाचे स्वरुपाचा अभ्यास केला आहे. प्रकरण पहिले भेदिक कविता, परंपरा आणि स्वरुप, संज्ञा, उत्पत्ती आणि विविध संप्रदायाच्या संबंधामध्ये या कवितेची परंपरा सांगून त्याचे स्वरुप व संज्ञा स्पष्ट करण्यासाठी विविध मतांचा आधार घेतलेला आहे आणि भेदिक शाहीर हे नाथपंथीच आणि महानुभाव संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचे प्रचार आणि प्रसार करताना दिसतात. त्यांचा एकमेकांशी निकटचा संबंध आहे हे ही आपणांस दिसून येते. त्या त्या संप्रदायाच्या शाळा व मठ यांची संख्याही मोठ्या प्रमाणात आहे हे ही दिसून आले. या शाळा व मठांच्या मधूनच शिष्यांना शिकवण दिली जाते. हे शाळा किंवा मठ नाथपंथी संस्थांनी जोपासलेले आहेत तसेच ते लोकाश्रयावर लोकशिक्षणासाठी शतकानुशतके सेवारत आहेत. त्यामधून हजारो ज्ञानी व सिध्दकोटीचे शाहीर तयार झालेली एक प्रदीर्घ परंपरा चालू होती हे पहावयास मिळाले. त्यांच्याकडील कविता विविध आशयांनी युक्त आहेत हे दिसून आले त्याच कविता रंजन व प्रबोधन करणाऱ्या आहेत हे दिसते.

नाथसंप्रदाय आणि शाहिरीचे मराठी संस्कृतीशी नाते अधिक जवळचे आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक मानदंडातून मराठी अस्मिता सिध्द करण्याचे काम भेदिक शाहिरीने केलेले आपणास दिसते. मराठी संस्कृतिचा गाभाच या कवितेत सातवाहन राजाच्या काळापासून सुरु झालेला आहे हे दिसून आले.

नाथसंप्रदाय आणि शाहीरीचे मराठी संस्कृतीची असलेले नाते तर **भेदिक कवितेचे संकलन, वर्गीकरण आणि त्यांची वैशिष्ट्ये** याचा विचार करुन त्यातील विविध कवितांचे म्हणजे गण, गवळण, पद (छंद), गर्भावळी, कटाव, साकी आरवी, आरती, श्लोक, बीर-कंगण टोणपे आणि कथात्मक लावणी अर्थात ऐकीव यांचे विवेचन करुन समाजाचे रंजन आणि उद्‌बोधन करण्यासाठी धार्मिकदृष्टीने तसेच प्रबोधनाच्या अंगाने विचार मांडला आहे. हे पाहता आले. या कवितेमधील 'धृपद',

'टोक', 'मुखडा' या गोष्टींची उकल केली आहे. शाहीरांचे आखाडे म्हणजे मठ, यामधून शिष्यांना प्रशिक्षित केले जाते हे सुध्दा पाहता आले, त्याचाही अभ्यास केला आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये भेदिक कवितेची परंपरा फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. त्याचे प्रत्यंतर 'माचणूर' मंगळवेढा येथे महाशिवरात्रीच्यानंतर 'पारणे' या दिवशी भव्य जंगी भेदिक फड भरला जातो. तेथे कलगीचे व तुरापक्षाचे शाहीर संख्येने येतात. गुरुला वंदन करतात, त्यांच्यामध्ये जुगलबंदी होते. हे प्रत्यक्ष पाहिले आहे. त्यांच्याकडील आदेश पाहून सर्व श्रोता प्रेक्षक आनंदी होतो. त्यांनी सादर केलेली ऐकीव ही तर समाज प्रबोधनाला उपयुक्त ठरतात. शाहीर बाळू घिसाडी हा निरक्षार शाहीर या शाहीराकडे आदराने पाहतात. त्यांच्याकडील सर्वज्ञानाचा अत्यंत नम्रपणे उल्लेख करतात. अशाच प्रकारचे शाहीर दादूभाई शेख, शाहीर बापू पटेल, शाहीर राजू वाघमारे, शाहीर सुरेश बेगमपुरे वरील दिग्गज शाहीरांच्या तालमीत घडले आहेत. हे तरुण शाहीर भेदिक कविताचे फडामध्ये आपली कविता सादर करतात. शाहीर बन्सी कांबळे हे उत्तम आवाज असलेले त्याच्याकडील नाट्यत्मकता तर श्रोत्यांना थक्क करणारी आहे. या जिल्ह्यातील शाहीर प्रत्येक गावोगावाच्या जत्रा-यात्रामध्ये सहभाग होतात आणि ही भेदिक कवितेची परंपरा पुढे चालू ठेवतात.

**भेदिक कवितांचा आशय आणि अभिव्यक्ती** या तिसऱ्या प्रकरणात, भेदिक कवितांचे विविध घटक त्यांचे विवेचन करुन त्यातील विषयानुसार वर्गीकरण केले आहे. त्यातील आशय हा समाजाचे रंजन करतो आणि नीतीचा उपदेश करतो. ही वैशिष्ट्ये दिसून येतात. तसचे 'गण' मध्ये गुरुवंदन नमन कशाप्रकारे केलेले असते याचीही उकल केलेली आहे. चढाच्या लावणीमधून कूट, यक्ष प्रश्न आणि आध्यात्मिक आशय कसा सांगितला आहे हे स्पष्ट केले आहे. शाहीर प्रश्नोत्तरे करताना दिसतो. त्याच्या आधारे कविता संगीतमय बनवून प्रेक्षकांचे समाराधन करतो इत्यादी गोष्टींची चर्चा केली आहे. यासाठी विविध घटकांच्या संहिता ठिकठिकाणी पेरलेल्या आहेत. एक उत्सुकता व कुतूहल म्हणून या कवितांमधील

विषयाची मांडणी केलेली असते. प्रेक्षकांच्या कल्पनाशक्तीला एकप्रकारचे आव्हानच केलेले असते हे पहावयास मिळाले.

भेदिक कवितेमधील मार्गाच्या कवितेमधून मार्गदर्शन, दिशा दिग्दर्शन केलेले असते. गुरुंचे माहात्म्याच्या आधारे नीतीची शिकवण दिलेली असते. सदगुरुचे वाक्य प्रमाण आहे. असा विचार बिंबविलेला दिसतो गुरु ही संस्कृतीची मूल्ये सांगितले आहेत. एक आदर्श, सुसंस्काराचा संदर्भ दिलेला असतो. भेदिक साकी या सैलस्वरुपाच्या रचनेतून प्रेक्षक श्रोता यांना गुरुमाहात्म्य हा विचार किती महत्त्वाचा असतो त्याच्या उपदेशाने आपली जीवन पध्दती उत्तम बनविता येते. हा हलका फुलका मार्ग कथन केलेला असतो. भेदिक गर्भावळीची रचनेमधून पिंड कसा बनतो, त्यासाठी कोणती वेळ व काळ महत्त्वाचा असतो. याचे विवरण केलेले असते, ही कविता महिलाश्रोता असल्याने शाहीर फडामध्ये सादर करताना दिसत नाही. परंतू ही कविता पिंड, ब्रह्मांड, देह याची निर्मिती कशी होते हे या रचनेचे वैशिष्ट्ये आहे. भेदिक पदे, छंद या कवितांमधून पंचइंद्रिये, षटविकार, अविचार याची उकल केलेली असते. समाजाला एक प्रकारचा सल्लाच दिलेला आहे. दुष्टप्रवृत्ती पासून त्यांने चार हात लांबविले पाहिजे असाही कानमंत्र दिला आहे. नाडी पिंड, औष्टपोट, औटमातृका इत्यादींचा ही परिचय करुन दिला आहे. या सर्वांवर नियंत्रण ठेवणे किती महत्त्वाचे आहे. असा उपदेश केला आहे. भेदिक फडात सादर न होणारी कविता म्हणजे बीर-कंगण - टोणपे यामध्ये महावीर वेताळ असे अघोरी प्रवृत्तींचे वर्णन केलेले असते. प्रतिपक्षावर चाल करण्यासाठी अशा बीरांचा नामोउल्लेख केला जातो. तर प्रतिस्पर्धकांना नामोहरम करण्यासाठी कोड्यात पकडणे त्याला बांगडी घालणे, 'कूट' रचना सांगून त्याला भयभीत करणे जेणे करुन त्याने आपल्यावर चाल करु नये असा विचार सांगितलेला आहे. टोणपे म्हधून त्या प्रतिस्पर्ध्याला शिव्या देणे, त्याला टोमणे मारणे या अर्थाची ही रचना सादर केली जात नाही. सोलापूरातील शाहीरांकडे या कवितांची संख्या कमी प्रमाणात आढळते यामधून जे सांस्कृतिक संदर्भ आहेत ते समाज सुसंस्कारित

करण्यासाठीच आलेले आहेत. तसेच कथात्मक लावणी म्हणजे ऐकीव ही रचना गद्य-पद्य मिश्रित स्वरुपाची असते. अशा ऐकीवांची संख्या मोठ्या प्रमाणात आाहे. या ऐकीवांचे पौराणिक, लोक कथात्मक, ऐतिहासिक, आणि सामाजिक अशा प्रकारात वर्गीकरण करुन त्याचे विश्लेषण केले आहे. त्या सर्व ऐकीवांमधून समाजला सांस्कृतीक करण्यासाठी विविध विषय आलेले आहेत. त्याचा तपशीलाने विचार करुन त्यातील सर्व मूल्ये ही समाज घडणीसाठी उपयुक्त आहेत असा निष्कर्ष मांडला आहे. सांस्कृतिक संचिनांचाही परामर्श घेतला आहे. त्यातील जे संदर्भ आहेत त्याची समाजाला किती उपयुक्तता हे मांडले आहे. भेदिक कविता सांस्कृतीक संदर्भ या प्रकरणातही विविध गण, गवळण, मार्गाची कविता, छंद, साकी, गर्भावळीची रचना, चवसर, बीर-कंगण-टोणपे, ऐकीव या रचनांची तपशीलाने विश्लेषण केले आहे. या कवितांचे संकलन करुन विविध विषयानुसार अभ्यास केला आहे. आणि एकेक घटकांचे विवेचन केले आहे. या कवितांमधील शाहीरांनी कथन केलेले संदर्भ पाहून त्यांच्यातील सांस्कृतिकतेचे समाजावर कसा प्रभाव पडल आहे हे पाहिले आहे. संस्कृतिची म्हणजे काव्य ते सांगून पारंपारिक विषयांचे विवेचन केले आहे. संस्कृती या शब्दांचा विविध ठिकाणी होणार उपयोग, त्याचे घटक, आणि मराठी माणसांवर संस्कृतिचा प्रभाव कसा पडल आहे. यासाठी लोकप्रतिभा आणि गुरुचरित्र, लोकसंस्कृतीचे उपासक, आणि शाहीरीची सांस्कृतिक पार्श्वभूमी याचा शाहीरीवाङ मयावर किती खोलवर प्रभाव पडलेला होता याचा विचार केला आहे.

**भेदिक कवितेतील सांस्कृतिक संदर्भ** महाराष्ट्राच्या मराठी मनावर कसे प्रभावित झाले होते हे पाहिले आहे. वडवळसिध्द नागनाथांची सांस्कृतिक परंपरा बौध्दसाहित्यातील जातककथा यामध्ये जे सांस्कृतिक संचित होते त्याचाही समाजावर परिणाम झाला आहे. भेदिक कवितेतील जे यक्षप्रश्न, कूटप्रश्न, आणि अध्यात्म असते. त्यामधील सांस्कृतिक संदर्भ समाजाला दिशा देणारे ठरले आहेत हे दिसते.

भेदिक कवितेतील ऐकीव रचनांमधून जे विषय येतात ती सांस्कृतिक जडणघडीत किती उपयुक्त ठरले आहेत. त्याचा समाजावर प्रभाव पडलेला आहे हे दिसते.

सोलापूर जिल्ह्यात भेदिक कविता संख्येने मोठ्याप्रमाणात आहे. जिल्हाभर या कविता गावून सादर केल्या जातात. शाहीरांकडील हस्तलिखिते (बाडाच्या वह्या) प्रत्येक्ष भेटून, किंबहुना त्यांच्या भेदिक फडाचे ध्वनिफितीमध्ये संकलन करुन, व्हिडीओ शूटिंगकरुन त्यांच्याशी चर्चा करुन साहित्य मिळविले आहे. या साहित्याच्या प्रसंगी संभावना झाली आहे परंतू ही परंपरा किमान १२ व्या शतकापासून चालत आली आहे. नाथसंप्रदायाने आपले तत्त्वज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी या कवितेचा उपयोग केला आहे. थोडक्यात, वाङ मयीन संस्कार झालेला आपणाला दिसतो. पुढे महानुभाव संप्रदायाने ही कवितेचा सन्मान केला आहे. समर्थांनी डफगाण असे म्हटले आहे. तर कूट, यक्ष, आध्यात्मिक रचना म्हणून या कवितेकडे पाहिले आहे आणि खऱ्या अर्थाने समाजाची सांस्कृतिक जडण-घडण होणेसाठी या कवितेचा उपयोग झाला आहे हे दिसते.

31-1-2012

**प्रा. डॉ. महादेव देशमुख**
**सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग**
**संगमेश्वर कॉलेज सोलापूर**